**मे. अंबुजा सिमेंट लि. मराठा लाईमस्टोन माईन, यांनी बाखर्डी, उप्परवाही, चांदूर, पिंपळगाव, लखमापूर आणि थुट्रा (ता. कोरपना) आणि सोनापूर (ता. राजूरा), जि. चंद्रपूर या गावांमध्ये मराठा लाईमस्टोन माईन-II (ML क्षेत्र – ८८०.३१ हेक्टर) मधील विद्यमान १२०० pH यांच्यासह लाइमस्टोन प्रोडक्शन कॅपॅसिटी (चुनखडी उत्पादन क्षमता) २.० दशलक्ष टन प्रतिवर्ष वरुन ३.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष विस्तार, पृष्ठभागावरची माती ०.२५ दशलक्ष टन प्रतिवर्ष, कचरा/अपव्यय (ओबी/आयबी) २.४० दशलक्ष टन प्रतिवर्ष, सबग्रेड ०.५० दशलक्ष टन प्रतिवर्ष (एकूण खोदकाम ६.६५ दशलक्ष टन प्रतिवर्ष) विस्तारीकरण प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबतचे इतिवृत्तांत**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ०३/०२/२०२५ |
| वेळ | : | सकाळी ११:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ, लखमापूर ऑफीस, मे. अंबुजा सिमेंट लि. मराठा लाईमस्टोन माईन, लखमापूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर. (जवळचे स्थळ) |

<u>प्रस्तावना:-</u>

मे. अंबुजा सिमेंट लि., मौजा उप्परवाही, ता. कोरपना, जि. चंद्रपूर यांनी त्यांच्या बाखर्डी, उप्परवाही, चांदूर, पिंपळगाव, लखमापूर आणि थुट्रा (ता. कोरपना) आणि सोनापूर (ता. राजूरा), जि. चंद्रपूर या गावांमध्ये मराठा लाईमस्टोन माईन-II (ML क्षेत्र-८८०.३१ हेक्टर) मधील विद्यमान १२०० pH यांच्यासह लाइमस्टोन प्रोडक्शन कॅपॅसिटी (चुनखडी उत्पादन क्षमता) २.० दशलक्ष टन प्रतिवर्ष वरुन ३.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष विस्तार, पृष्ठभागावरची माती ०.२५ दशलक्ष टन प्रतिवर्ष, कचरा/अपव्यय (ओबी/आयबी) २.४० दशलक्ष टन प्रतिवर्ष, सबग्रेड ०.५० दशलक्ष टन प्रतिवर्ष (एकूण खोदकाम ६.६५ दशलक्ष टन प्रतिवर्ष) विस्तारीकरण प्रकल्पाच्या उभारणीच्या प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी, आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-१ (अ) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. अंबुजा सिमेंट लि., मौजा उप्परवाही, ता. कोरपना, जि. चंद्रपूर, महाराष्ट्र यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २५/१०/२०२४ अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक

जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र देशोन्नती, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया, नागपूर यात इंग्रजीत दिनांक ३१/१२/२०२४ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२.
३. प्रादेशिक कार्यालय व उप-प्रादेशिक कार्यालय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
५. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
६. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
७. उप-विभागीय कार्यालय, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
८. उप-विभागीय कार्यालय, कोरपना, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
९. तहसिल कार्यालय, कोरपना, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
१०. तहसिल कार्यालय, राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर.
११. नगर परिषद कार्यालय, गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
१२. पंचायत समिती कार्यालय, कोरपना, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
१३. पंचायत समिती कार्यालय, राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर
१४. ग्रामपंचायत कार्यालय भेंडवी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
१५. ग्रामपंचायत कार्यालय हरदोना, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
१६. ग्रामपंचायत कार्यालय ईसापूर, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
१७. ग्रामपंचायत कार्यालय मंगी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
१८. ग्रामपंचायत कार्यालय सोनापूर, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
१९. ग्रामपंचायत कार्यालय जामनी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.

२०. ग्रामपंचायत कार्यालय चंदनवाही, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
२१. ग्रामपंचायत कार्यालय नोकारी खुर्द, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
२२. ग्रामपंचायत कार्यालय थुटरा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
२३. ग्रामपंचायत कार्यालय उप्परवाही, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
२४. ग्रामपंचायत कार्यालय लखमापूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
२५. ग्रामपंचायत कार्यालय कुकूडसाथ, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
२६. ग्रामपंचायत कार्यालय बिबी, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
२७. ग्रामपंचायत कार्यालय नांदा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
२८. ग्रामपंचायत कार्यालय चांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
२९. ग्रामपंचायत कार्यालय निमाणी, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
३०. ग्रामपंचायत कार्यालय बाखर्डी, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
३१. ग्रामपंचायत कार्यालय तळोधी, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
३२. ग्रामपंचायत कार्यालय पालगाव, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
३३. ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगांव, ता. कोरपना, जि. चंद्रपूर
३४. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ:- www.mpcb.gov.in

वरिल अनुक्रमांक ०५ ते ३३ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू जनसुनावणी ही प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-१३/२०२५ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डब्ल्युपीसी) पीएच/बी-२५०१२४-एफटीएस-०१७४ दिनांक २४/०१/२०२५ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आली होती:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |

३) उप-प्रादेशिक अधिकारी, - **समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
चंद्रपूर

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत १७९ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री उमाशंकर भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. डी.एस.कुंभार, निवासी उप-जिल्हाधिकारी, चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले.

समन्वयक यांनी सांगितले की उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत मांडलेल्या प्रस्तावित प्रकल्पाविषयीच्या पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) व इतर संबंधित मुद्यांबाबत सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) व इतर संबंधित मुद्यांबाबत सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती

- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयक प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे आहेत:-**

१) **श्री. राजेश वा. बेले, संस्थापकीय अध्यक्ष, संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्था, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने खोटा पर्यावरण आधात मुल्यांकन अहवाल सादर केला आहे. सदर अहवाल मागील जनसुनावणीमध्ये सादर केलेल्या अहवालासारखे आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर अहवालाचे अवलोकन केले आहे किंवा कसे याबाबत शंका आहे. सदर अहवालामध्य नमूद वायु प्रदूषण निर्देशांक फार जुने आहे. तसेच वायु प्रदूषण निर्देशांकाचे मोजमाप करतेवेळी परिसरातील ७ गावातील लोकप्रतिनिधी किंवा ग्रामपंचायतीचे सचिव तसेच प्रदूषण नियंत्रण अधिकारी उपस्थित नव्हते. अहवालातील संपूर्ण आकडेवारी फेरबदल करून सादर करण्यात आले आहेत. पर्यावरण जनसुनावणीमध्ये वारंवार जनतेची दिशाभूल करण्यात येत आहे. अस्तित्वात असलेल्या प्रकल्पामधून मोठ्या प्रमाणात वायु प्रदूषण होत आहे व त्याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उद्योगास कारणे दाखवा नोटीस | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं. १० मध्ये नमूद आहे. |

| | | |
|---|---|---|
| | बजाविलेले आहे. तसेच सदर सिमेंट उद्योगाची ₹५.० लक्षची बँक हमी जप्त करण्यात आली आहे. प्रकलपाचे सादरीकरण कोणत्याही गावकऱ्याला स्पष्ट दिसले नाही. तसेच उद्योगावर करण्यात आलेल्या कारवाईबाबत सादरीकरणामध्ये उल्लेख करण्यात आला नाही. परिसरातील उप्परवाही, चांदूर, लखमापूर, थुट्रा, सोनपूर, कोरपना, राजूरा व गडचांदूर ही गावे प्रदूषणाने ग्रस्त असताना सदर प्रकल्पास जनसुनावणी घेण्यास परवानगी कशी मिळाली हा मुख्य प्रश्न आहे. परिसरातील रस्त्यांची अवस्था फार खराब आहे. त्यामुळे स्थानिक नागरीकांना रात्री प्रवास करणे अशक्य झाले आहे. वाहनांची वेगमर्यादा ठरलेली नाही. तसेच वाहतूक करणारी वाहने परिवहन विभागांच्या नियमांचे पालन करत नाहीत. येथे प्रदूषणावर नियंत्रण करण्याकरिता करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती देण्यात आलेली नाही. शेतकऱ्यांना कंपनीच्या वायु प्रदूषणामुळे होणाऱ्या पिकांच्या नूकसानीबाबत नूकसान भरपाई देण्यात येत नाही. परिसरातील अनेक गावकरी मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रारी करतात पंरतु त्याबाबत कोणतीही उपाययोजना करण्यात येत नाही. मागील जनसुनावणीदरम्यान उभारण्यात आलेले मंडप तुटले. तरी सदर उद्योगास पर्यावरण मंजूरी प्रदान करण्यात आली. सदर जनसुनावणीला आमचा पूर्णपणे विरोध आहे. सदर प्रकल्पास पर्यावरण मंजूरी प्रदान करण्यात आली तर त्या विरोधात न्यायालयात दाद मागण्यात येईल. | |

## २) श्रीमती जिजाबाई मारोतीराव बल्की, उप्परवाही, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सन २०२० पासून अंबुजा सिमेंट उद्योग अस्तित्वात आहे. तेव्हापासून मी बचत गटाचे काम करत आहे. परिसरातील सर्व बचत गट अंबुजा सिमेंट फाऊंडेशन सोबत जोडण्यात आले आहेत व त्यांच्यासोबत काम सुरू आहे. १२ गावांमध्ये ग्रामपंचायतील हात पंप पूरविलेले आहेत. तसेच अंबुजा सिमेंट तर्फे गावांमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा पूरविण्यात आली आहे. अंबुजा सिमेंट कंपनीने गावांमध्ये ग्रामपंचायत भवन, आरोग्य सुविधा, रस्त्यांची सुविधा व स्थानिक महिलांना नौकरी उपलब्ध करून | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं. १० मध्ये नमूद आहे. |

| | | |
|---|---|---|
| | दिलेली आहे. परिसरातील १२ गावातील बचत गट मिळून अंबुजा फाऊंडेशनच्या सहाय्याने एकता स्वयंसहायता संस्था उघडण्यात आलेली आहे. सदर संस्थेच्या माध्यमातून जवळपास २५-३० महिलांना नौकरी मिळालेली आहे. त्यामध्ये या १२ गावातील विधवा व निराधार महिलांचा समावेश आहे. सदर परिसरात ०३ कॅन्टीन सुरू करण्यात आलेल्या आहेत व प्रत्येक कॅन्टीनमध्ये जवळपास २५-३० महिलांना नौकरी उपलब्ध झालेली आहे. त्याचप्रमाणे वाहन खरेदी करून त्याद्वारे सुद्धा नौकरी देण्यात आलेली आहे. सदर परिसरामध्ये वायु प्रदूषणाच्या समस्येवर कंपनीने उपाययोजना करावी. तसेच धुळीच्या प्रदूषणामुळे झालेल्या नूकसानीबाबत कंपनीने नूकसान भरपाई द्यावी. सदर परिसरामध्ये समाजकंटक बाबी घडत असल्याने या परिसरात पोलिस स्टेशन होणे आवश्यक आहे. कंपनीने परिसरातील सुक्षिक्षीत बेरोजगरांना नौकरी उपलब्ध करून दिली आहे व त्यांना नागपूर, पुणे, मुंबई सारख्या ठिकाणी पाठविण्यात आले आहे. | |

**३) श्रीमती चंदा रामगिरवार, सचिव, एकता महिला सक्षमीकरण संस्था, हरदोना, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या संस्थेसोबत एकूण २८३० महिला जुळलेल्या आहेत. अंबुजा सिमेट फाऊंडेशनच्या सहाय्याने संस्थेतील महिलांना नौकरी उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामध्ये शेती पूरक व्यवसाय, मजूरी करणाऱ्या विधवा, निराधार महिलांसाठी व्यवसाय उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच गावामध्ये रस्त्याचे बांधकाम, स्मशानभूमीचे बांधकाम करण्यात येत आहे. अंबुजा फाऊंडेशनच्या मदतीने गावांमध्ये आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच आरोग्य शिबीरांचे आयोजन करण्यात येत आहे. बचत गटांच्या माधमातून महिलांना बँकसोबत जोडण्यात आले आहे. तसेच महिलांना शेती व व्यवसायाकरिता अंदाजे ₹६.० कोटींचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. तसेच बचत गटाच्या माध्यमातून गावांमध्ये वृक्ष लागवड देखील करण्यात आली आहे. तसेच युवतींसाठी मार्गदर्शन शिबीरे | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं. १० मध्ये नमूद आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आयोजित करण्यात आली आहेत. तसेच पिपरडा गावामध्ये सॅनिटरी पॅड मशीन उपलब्ध करून महिलांना नौकरी उपलब्ध करून दिली आहे. उपरोक्त सर्व कामांसाठी अंबुजा फाऊंडेशनतर्फे सतत मार्गदर्शन करत आहे. कंपनीला विनंती आहे की त्यांनी वायु प्रदूषणाबाबतच्या उपाययोजना कराव्या. तसेच गावांमध्ये आरोग्य सुविधा, शिक्षण सुविधा व इतर सुविधा पूरवाव्या. | |

४) **<u>श्रीमती मेहराज ताहीर शेख, पिपरडा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अंबुजा फाऊंडेशनच्या सहाय्याने गावामध्ये संपदा महिला बचत गट स्थापन करण्यात आले व त्यामुळे महिला सक्षमीकरण करण्यात आले आहे. तसेच व्यवसाय उभारण्यात मदत करण्यात आली आहे. बचत गटांमुळे सॅनिटरी नॅपकिन मशीन व इतर व्यवसाय उभारण्यात मदत झाली व स्थानिक महिलांना नौकरी प्राप्त झाली. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं. १० मध्ये नमूद आहे. |

५) **<u>श्री. आबाजी हरीभाऊ बोबडे, उप-सरपंच, पिपंळगांव, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावामध्ये सीएसआर निधीमार्फत शाळेमध्ये ग्रंथालय बनविण्यात आले आहे. दवाखान्याची सुविधा पूरविण्यात आली आहे. गावामध्ये रस्ते बांधून देण्यात आले आहेत. अंबुजा फाऊंडेशन तर्फे गावात विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. माझे गांव सदर प्रस्तावित खाणीपासून २ ते २.५ कि.मी. अंतरावर आहे. माझी कंपनीला विनंती आहे की त्यांनी गावातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी, पिण्यासाठी व नाल्यासाठी पाण्याची कमतरता पडु देऊ नये. कंपनीने गावामध्ये शेततळे व बंधारे बांधून द्यावे. कंपनीने वायु, जल व ध्वनी प्रदूषणाच्या उपाययोजना कराव्या जेणेकरून स्थानिकांचे नूकसान होणार नाही. परिसरातील गावांमध्ये सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्या. कंपनीने स्थानिक सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगारात प्राधान्य द्यावे. यापूर्वी मे. अल्ट्राटेक सिमेंटबाबत मा. जिल्हाधिकारी व प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडे तक्रार दाखल करण्यात | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं. १० मध्ये नमूद आहे.<br><br>समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कंपनीने म.प्र.नि. मंडळाने दिलेल्या संमतीपत्रातील अटींचे काटेकोरपणे पालन करावे. |

| | | |
|---|---|---|
| | आली होती परंतु आजपर्यंत त्या तक्रारीचे निराकरण करण्यात आले नाही. माझी विनंती आहे की प्रदूषण नियंत्रण अधिकाऱ्यांनी सदर तक्रारीचे निराकरण करावे. मे. अल्ट्राटेक कंपनीमुळे परिसरातील भूजलाची पातळी खालावली आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे. अल्ट्राटेक सिमेंट उद्योगास योग्य त्या उपाययोजना करण्यास निर्देशित करावे अशी विनंती आहे. तशीच परिस्थिती या प्रकल्पामुळे होऊ याची काळजी प्रकल्प प्रवर्तकांनी घ्यावी. | |

६) **<u>सौ. इंदिरा गितेश बंडवाल, तंटामुक्ती सदस्य, थुट्रा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अंबुजा सिमेंट फाऊंडेशनतर्फे बचत गटांना मार्गदर्शन मिळाले व त्यामुळे परिसरातील महिला कुक्कुटपालन, कापड उद्योग, डेअरी व्यवसाय या सारखे व्यवसास स्थापित करू शकलेल्या आहेत. बचत गट व अंबुजा फाऊंडेशनमुळे परिसरातील महिलांचे सक्षमीकरण झाले आहे. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं. १० मध्ये नमूद आहे. |

७) **<u>श्री. शुभम पुरूषोत्तम थिपे, ग्रामपंचायत सदस्य, लखमापूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रस्तावित प्रकल्पामुळे लगतच्या परिसरातील शेतीचे नूकसान होणार नाही यासाठी कंपनीने उपाययोजना कराव्या. कंपनीने अंदाजे १५-२० वर्षांपूर्वी या परिसरातील अधिग्रहीत केलेल्या जमीनीच्या मालकांना आजपर्यंत नौकऱ्या दिलेल्या नाहीत. त्यामध्ये श्री. सुधाकर पाटील भोजेकर, श्री. विनायक पाटील पिंपळशेंडे व श्री. गोसावी पाटील पारखी यांचा समावेश आहे. माझी कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी या प्रकल्पग्रस्त व्यक्तिंना प्रकल्पात तात्काळ नौकऱ्या द्याव्यात. श्री. टोंगे यांच्या शेतीपासून पिंपळगावाला जोडणारा ३३ फुटाचा पांदण रस्ता बंद करण्यात येऊ नये. तसेच श्री. पांडुरंग पोतराजे यांच्या घरापासून जाणारा पांदण रस्ता देखील बंद करण्यात येऊ नये. गडचांदूर रेल्वे कॉसिंगचे काम सुरू असल्यामुळे अंबुजा सिमेंटची वाहतूक थुट्रा मार्गे | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं. १० मध्ये नमूद आहे. |

| | | |
|---|---|---|
| | वळविण्यात आली आहे. त्यामुळे थुट्रा गावातील रस्ता पूर्णपणे खराब झालेला आहे. त्या रस्त्याचे बांधकाम कंपनीने करून द्यावे. स्थानिक सुशिक्षीत बेरोजगारांना या प्रकल्पामध्येच नौकऱ्या देण्यात याव्या. | |

### ८) <u>सौ. वर्षा दिनेश लेकलवार, भेंडवी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अंबुजा सिमेंट फाऊंडेशनमुळे गावात सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत. तसेच गावातील स्मशानभूमिचे सुशोभीकरण करण्यात आले असून तेथे ऑक्सीजन पार्क बनविण्यात आले आहे. अंबुजा सिमेंट फाऊंडेशनतर्फे महिला सक्षमीकरण करण्यात आले आहे. बेरोजगार महिलांना नौकरी उपलब्ध करून दिली. आरोग्य विषयक सुविधा, शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. तसेच गावातील शाळांमध्ये गरीब विद्यार्थ्यांकरिता २० पुस्तक परींची नेमणूक अंबूजा सिमेंट फाऊंडेशनतर्फे करण्यात आली आहे. तसेच २० आरोग्य सखींची नेमणूक करण्यात आली आहे. कंपनीने पुढे देखील अशीच विकासाची कामे करावी ही विनंती आहे. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं. १० मध्ये नमूद आहे. |

### ९) <u>श्री. सतिश सुरेश बेतावार, गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | खाणीचा एक चुनखडीचा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला व आज दुसऱ्या प्रकल्पाची जनसुनावणी येथे आयोजित करण्यात आली आहे. परंतु ज्या प्रकल्पग्रस्तांवर अन्याय झाला त्याचा तोडगा आजपर्यंत निघालेला नाही. प्रकल्पग्रस्त आजपर्यंत न्यायालयात व अंबुजा सिमेंट यांच्याकडे दाद मागत आहे. अंबुजा सिमेंट उद्योग सन १९९१ पासून या क्षेत्रात कार्यरत आहे परंतु गडचांदूर शहराकरिता कोणत्याही प्रकारचे विकासात्मक कामे केलेली नाही. सदर सिमेंट उद्योगामुळे गडचांदूर शहराला प्रदूषणाचा त्रास होत आहे. परंतु सदर कंपनी सीएसआर निधी गडचांदूर शहरामध्ये उपाययोजनांसाठी खर्च न करता दुसऱ्याच गावांमध्ये खर्च करत आहे. स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नौकरी उपलब्ध न करता सदर | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं. १० मध्ये नमूद आहे.<br><br>समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, अंबुजा सिमेंट कंपनीने म.प्र.नि. मंडळाने दिलेल्या संमतीपत्रातील अटींचे काटेकोरपणे पालन करावे. |

| | | |
|---|---|---|
| | कंपनी बाहेरील व्यक्तिंना नौकरी देत आहे. स्थानिकांची या उद्योगातून दुसऱ्या उद्योगामध्ये बदली करण्यात येते किंवा स्वैच्छिक सेवानिवृत्ती घेण्याचा पर्याय देण्यात येतो. येथे उपस्थित गंगु नैतामच्या शेतीच्या सभोवताल अंबुजा सिमेंटची खाण आहे, त्यामुळे सदर इसमास शेती करणे कठीण झाले आहे. सदर इसमाची शेती प्रकल्पामध्ये अधिग्रहीत का करण्यात आली नाही याबाबत प्रशासनाने माहिती घ्यावी. प्रकल्प राबविताना होणाऱ्या पर्यावरणीय नूकसानीबाबत कंपनी कोणत्या उपाययोजना करणार आहे याबाबतची माहिती कंपनीने या जनसुनावणी दरम्यान द्यावी. भविष्यात येणाऱ्या प्रकल्पामुळे होणारा पर्यावरणीय ऱ्हास व प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळाला पाहिजे ही आमची मागणी आहे. गडचांदूर नगर परिषद हद्दीत अंबुजा सिमेंट कंपनीने कोणत्याही प्रकारचे CSR मधून काम केलेले नाही. त्यामुळे गडचांदूर शहराचा होणारा पर्यावरणीय ऱ्हास याबाबत कंपनी कोणत्या उपाययोजना करणार आहे याची माहिती कंपनीने द्यावी. तसेच कंपनीने सदर इसमाची शेतजमीन अधिग्रहीत करावी ही आमची मागणी आहे. | |

**१०) <u>प्रकल्प प्रवर्तकातर्फे देण्यात आलेली उत्तरे खालीलप्रमाणे आहेत:-</u>**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | सदर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल राष्ट्रीय परीक्षण व अंशशोधन प्रयोगशाळा प्रत्ययन बोर्ड (NABL) मान्यताप्राप्त पर्यावरणीय सल्लागार संस्थेमार्फत तयार करण्यात आला आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सन २०२१ व २०२४ मध्ये तयार करण्यात आला आहे. सदर खाणीची म.प्र.नि. मंडळाकडुन कोणत्याही प्रकारची बँक हमी जप्त करण्यात आलेली नसून सिमेंट उद्योगाची बँक हमी जप्त करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकल्पाच्या एकूण गुंतवणूकीपैकी २० टक्क्यांची गुंतवणूक पर्यावरण संरक्षणाच्या उपाययोजनांवर करण्यात येणार आहे. त्यामध्ये विविध प्रकारची पाणी फवारणी यंत्रणा, उच्च दर्जाचे अद्यावत बॅग फिल्टर्स बसविण्यात आले आहेत. खाणीमधून होणाऱ्या वाहतूकीकरिता पाण्याची फवारणी करण्यात येते. तसेच मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली आहे. ट्रान्स्पोर्ट नगर येथे पोलिस स्टेशन उभारण्याकरिता अंबुजा सिमेंटतर्फे स्थानिक प्रशासनास पत्रव्यवहार करण्यात येईल व त्याबाबत योग्य ती मदत देखील करण्यात येईल. आजपर्यंत कंपनीने रोजगारात ९० टक्के स्थानिकांना प्राधान्य दिले आहे. सदर प्रस्तावित प्रकल्पामध्येदेखील स्थानिकांनाच रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. कंपनीतर्फे कोणत्याही कामगारास स्वैच्छिक सेवानिवृत्ती घेण्यास कुठल्याही प्रकारची जबरदस्ती करण्यात येत नाही व यापुढे देखील करण्यात येणार नाही. पिंपळगाव जवळील रस्ता बंद होणार नाही. भविष्यात रस्ता बंद करण्याची वेळ आली तर याबाबत गावकऱ्यांसोबत बैठक आयोजित करून यावर तोडगा काढण्यात येईल. |

## ११) श्री. सतिश गणपतराव उपलंचीवार, गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिक या शब्दाची व्याख्या सांगावी. प्रकल्प गावात आला पाहिजे. प्रकल्प आल्याने गावातील स्थानिकांना नौकरी उपलब्ध होईल. प्रकल्पात स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येत नाही. प्रकल्पग्रस्त नागरीकांना कंपनीने नौकरीत प्रथम प्राधान्य द्यावे. ज्या स्थानिकांच्या जमीनी पूर्णपणे अधिग्रहीत करण्यात येत नाहीत अशा स्थानिकांना नौकरी देण्यात येते व त्यांची परराज्यात बदली करण्यात येते. अशा व्यक्तिवर त्याच्या परिवाराची पूर्ण जबाबदारी असते व त्याला नाईलाजाने स्वेच्छा निवृत्ती घ्यावी लागते. त्यामुळे माझी कंपनीला विनंती आहे की त्यांनी स्थानिकांना वयोमर्यादा होत पर्यंत याच प्रकल्पामध्ये नौकरी द्यावी. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

## १२) श्री. विक्रम नामदेवराव येरणे, नगरसेवक तथा सभापती, गडचांदूर नगर परिषद, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | दि. ०३/०५/२०२३ रोजी थुट्रा येथे अंबुजा सिमेंटची जनसुनावणी आयोजित करण्यात आली होती त्याला पर्यावरण मंजूरी मिळाली किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर त्या जनसुनावणीचे ईतिवृत्तांत उपलब्ध नाहीत. सदर प्रस्तावित ८८० हेक्टर क्षेत्रातील खाणीचा समावेश जुन्या प्रकल्पातच करण्यात आला आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. त्या खाणीचे खाणलीज क्षेत्र किती होते? भारतीय खाणी ब्युरो, नागपूर यांनी दि. १४/०१/२०२३ रोजी आपल्या खाणीची पाहणी केली होती. त्यामध्ये नमूद आहे की कंपनी ५७९.९० हेक्टर जमीन कंपनी वापरत होती व त्यानंतर दि. ०३/०५/२०२३ रोजी आपण आणखी ५०० हेक्टर खाण लीज क्षेत्रात चुनखडी उत्खननाच्या प्रस्तावाकरिता जनसुनावणी घेतली होती. त्यानंतर परत आज या ठिकाणी ८८० हेक्टर खाण लीज क्षेत्रासाठी शासनाकडे परवानगी मागत आहात. भारतीय | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, मागील जनसुनावणी ही वेगळ्या खाण लीज क्षेत्राची होती. त्या खाणीचे खाणक्षेत्र ५७९.९० हेक्टर इतका होता. त्याचे विस्तारीकरण करण्यात आले नाही. कंपनीने नविन जागा अधिग्रहीत केलेली नाही. सदर खाण प्रकल्पाच्या विस्तारीकरणाबाबत सदर जनसुनावणी आयोजित करण्यात आली आहे. सदर ८८० हेक्टर जागेपैकी ५७५ हेक्टर क्षेत्रामध्ये खाणकाम प्रस्तावित आहे. भविष्यात जागेची गरज असल्यास त्याबाबत विचार करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | खाण ब्यरोच्या अहवालानुसार कंपनी फक्त ९७.१७ हेक्टर क्षेत्रात उत्खनन करत आहे. मे. अंबुजा कंपनी अंदाजे ५००० हेक्टर जागा अधिग्रहीत करत आहे व खाणकाम फक्त १२५ हेक्टर क्षेत्रात करत आहेत. अंबुजा कंपनीने उर्वरित जमीनीचा वापर करायला पाहिजे. इतक्या मोठ्या प्रमाणात अंबुजा सिमेंटचे जमीन अधिग्रहणाचे कारण कंपनीने स्पष्ट करावे. कंपनीने गडचांदूर-राजूरा दरम्यान रस्त्याच्या कडेला असलेली जागा अधिग्रहीत केलेली असून ती कोणत्याच वापरात नाही. कंपनीच्या उपयोगात नसलेल्या जागेवर दुसरी विकासकामे जसे की, क्रिडांगण तयार करावे किंवा त्या जागेवर कंपनीने वृक्षारोपण करावे जेणेकरून सदर जागेवर अतिक्रमण होणार नाही. मागील जनसुनावणीदरम्यान उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांवर उत्तर प्राप्त झालेले नाही. सद्य:स्थितीत नौकरी मिळत नाही आणि जर नौकरी मिळाली तर त्या व्यक्तिची दुसऱ्या ठिकाणी बदली करण्यात येते किंवा त्यांना स्वेच्छा निवृत्ती घेण्यास सांगितले जाते. ही बाब गंभीर व अयोग्य आहे. तसेच काही स्थानिक लोकांची जमीन मीगल २० वर्षापासून कंपनीने अधिग्रहीत केलेली असून त्यांना आजपर्यंत नौकरी दिलेली नाही. त्यांना नौकरी देण्यात यावी. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाबाबत उद्भवलेल्या शंकेचे निराकरण कोणत्याच कंपनीद्वारे करण्यात आले नाही. म.प्र.नि. मंडळाने गडचांदूर नगर परिषदेच्या इमारतीवर हवा गुणवत्ता तपासणी यंत्रणा बसविलेली आहे. त्या सयंत्रणेला कोणी चालविताना दिसत नाही परंतु त्याची आकडेवारी म.प्र.नि. मंडळाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतात. जर त्या आकडेवारीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समावेश होत असले तर ही स्थानिक जनतेची दिशाभूल करणारी बाब आहे. ट्रांस्पोर्ट नगर येथे अवैध पार्कींगची समस्या आहे परंतु त्याबाबत कंपनीने कोणत्याही प्रकारची उपाययोजना केलेली नाही. थुट्रा येथे खाणीचा खड्डा बुजविण्यात आला नसून त्यामुळे तेथे अनेक नागरीकांचा मृत्यू होत आहे. कंपनीने ८० हेक्टर जमीन गडचांदूर क्षेत्रात अधिग्रहीत केलेली आहे. परंतु अंबुजा सिमेंटने सीएसआर निधीमार्फत कोणत्याही प्रकारची विकासकामे केलेली नाहीत. कंपनी मोठ्या प्रमाणात जमीन अधिग्रहीत करत असल्यामुळे जवळील ताडोबा अभयारण्य प्रकल्पातील वाघ सारखे प्राणी या खाण लीज क्षेत्रामध्ये वावरताना | |

१५) **श्री. हरिशचंद्र थिपे, सेवानिवृत्त शिक्षक, लखमापूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सन १९९९ मध्ये कंपनीने काही शेतकऱ्यांच्या जमीनी अधिग्रहीत केलेल्या आहेत व त्याचा मोबदला देखील दिलेला आहे. परंतु काही शेतकऱ्यांनी वाढीव मोबदल्यासाठी न्यायालयात दाद मागितली व त्याबाबत न्यायालयाने निर्णय पारीत केला आहे. कंपनीने त्या काळातील ज्या शेतजमीनी अधिग्रहीत केलेल्या आहेत अशा सर्व शेतकऱ्यांना न्यायालयाचा निकाल लागू करावा. त्या विरोधात कंपनीने उच्च न्यायालयात दाद मागू नये. सन १९९९ मध्ये अधिग्रहीत केलेल्या जमीनींच्या सर्व मालकांना सदर निर्णय लागू करण्यात यावा. कंपनीतर्फे परिसरात शिक्षणाची सुविधा पूरविण्यात आलेल्या आहेत. त्याचे विस्तारीकरण कसे करता येईल याबाबत कंपनीने विचार करावा. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

१६) **श्री. मनोहर संभाजी कुळसंगे, उप्परवाही, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अंबुजा कंपनी मागील २५ वर्षापासून येथे कार्यरत आहे. सद्य:स्थिती कंपनीचे मालक अदानी समूह आहे. कंपनीबाबत वेळोवेळी जनसुनावण्या घेण्यात आलेल्या आहेत व त्यादरम्यान मी मुद्दे उपस्थित केले होते. म.प्र.नि. मंडळाने उद्योगामुळे प्रदूषण होत असल्याचे मान्य केले आहे व उद्योगाची ₹५.० लक्षची बँक हमी जप्त केलेली आहे. सदर पत्रानूसार पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याबाबत नमूद आहे. सदर उद्योगाच्या प्रदूषणामुळे परिसरातील नागरीकांचे आयुष्य १०-१५ वर्षांनी कमी झाले आहे. प्रदूषणाने ग्रस्त नागरीकांसाठी प्रदूषण नियंत्रण मंडळ व कंपनीने उपाययोजना कराव्या. श्री. रामकृष्ण मुसळे यांच्या शेतजमीनीचे व पिकांचे कंपनीच्या कोळसा, सिमेंट व फ्लाय ॲशच्या धुळीमुळे सन २०१६ पासून नूकसान होत असून याबाबत वेळोवेळी शासनाचे अधिकारी व प्रकल्पाचे अधिकारी यांच्यासमवेत बैठका होऊन देखील सदर प्रश्न निकाली काढण्यात आला नाही. मा. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | जिल्हाधिकारी यांनी उप-विभागीय अधिकारी राजूरा यांना त्यांच्या स्तरावर सदर प्रश्न निकाली काढण्याचे सूचित केले होते. तत्कालीन प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी देखील भेंडवी येथे झालेल्या जनसुनावणीमध्ये कंपनीला याबाबत तोडगा काढण्याचे सुचित केले होते. मा. जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, कृषी विभागाचा अहवाल तयार असून देखील सदर प्रकरणी निकाल लागलेला नाही. त्यामुळे कंपनीने लक्ष देऊन सदर प्रकरण निकाली काढावे. अस्तित्वात असलेल्या सिमेंट उद्योगाचे विस्तारीकरणाचे काम सुरू आहे, परंतु तेथे स्थानिकांना नौकरी उपलब्ध झालेली नाही. माझी कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी या परिसरातील ५३० शेतकऱ्यांच्या मुलांना प्रकल्पामध्ये नौकरी देण्यात यावी. अंबुजा सिमेंट पूर्वी सन १९८५ ते १९९० दरम्यान येथे हरीगंगा सिमेंट कंपनी कार्यरत होती. सदर कंपनीच्या चुनखडी खाण क्षेत्रातील गावाचे पुनर्वसन करण्यात आले व सोनापूर बस स्थानकाजवळ १ एकर क्षेत्रामध्ये रामपूर या नावाने पुनर्वसन करण्यात आले आहे परंतु तेथे कोणत्याही सुविधा पूरिवण्यात आलेल्या नाहीत. कंपनीने रामपूर गावातील नागरीकांसाठी सर्व प्रकारच्या सुविधा पूरवाव्यात. अंबुजा सिमेंट प्रकल्पालगत १०-१५ गावे येतात. त्या क्षेत्रात आदिवासी नागरीकांच्या सर्वांगीण विकासासाठी तेथील संस्थेला कंपनीने मदत करावी व आदिवासी नागरीकांसाठी सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. उप्परवाही ते सोनापूर, भेंडवी, ईसापूर व गोपालपूर या गावांना जोडणारे पांदण रस्ते कंपनीने बंद केले आहे. कंपनीला विनंती आहे की त्यांनी उप्परवाही ते सोनापूर दरम्यान पक्क्य रस्त्याचे बांधकाम करून द्यावे जेणेकरून कंपनीतील कर्मचाऱ्यांना दळण-वळणाकरिता सुविधा होईल. | |

**१७) <u>अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, उपस्थितांनी त्यांचे मुद्दे थोडक्यात मांडावे. |

१८) **श्री. रामकृष्ण मुसळे, लखमापूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या जागा घेण्यात येत आहेत. याशिवाय स्थानिकांची या उद्योगातून दुसऱ्या उद्योगामध्ये बदली करण्यात येते किंवा स्वैच्छिक सेवानिवृत्ती घेण्याचा पर्याय देण्यात येतो. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीतर्फे कोणत्याही कामगारास स्वैच्छिक सेवानिवृत्ती घेण्यास कुठल्याही प्रकारची जबरदस्ती करण्यात येत नाही व यापुढे देखील करण्यात येणार नाही. |

१९) **श्री. शुभम अरूण उरकुंडे, लखमापूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मागील जनसुनावणीमध्ये कंपनीने रोजगारासंबंधी आश्वासने दिली होती परंतु एक वर्ष उलटुन देखील स्थानिक प्रकल्पग्रस्त सुशिक्षीत बेरोजगारांना नौकरी दिलेली नाही. कंपनी स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नौकरी देत नसेल तर स्थानिकांना त्यांच्या जमीनी परत करून द्याव्यात. सदर खाणीतून होणाऱ्या वाहतूकीमुळे धुळीचे प्रदूषण होत आहे. वाहतूकीच्या रस्त्यावर पाणी फवारणी करण्यात येत नाही. जनसुनावणी असल्यामुळे मागील आठवड्यापासून रस्त्यावर पाणी फवारणी करण्यात येत आहे. मागील जनसुनावणी दरम्यान कंपनीने लिखीत स्वरूपात आश्वासने दिली होती परंतु ती पूर्ण करण्यात आली नाही. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

२०) **श्री. अरूण विजयराव रागीट, सरपंच, ग्रामपंचायत बाखर्डी, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अंबुजा सिमेंटने परिसरातील शेतकऱ्यांच्या जमीनी अधिग्रहीत केलेल्या असून त्यावर कंपनी तात्काळ खाणकाम सुरू करणार आहे किंवा आज जमीन अधिग्रहीत करून १०-१५ वर्षानंतर खाणकाम सुरू करणार आहे याबाबत माहिती द्यावी. कंपनी १०-१५ वर्षानंतर खाणकाम करणार असेल तर कंपनीने त्याकाळात असणाऱ्या जमीनीच्या दराप्रमाणे मोबदला कंपनीने द्यावा. सीएसआरच्या माध्यमातून बाखर्डी गावाला | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, अंबुजाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये वीजतंत्री, वेल्डर, फिटर, गेज मशीन व सुरक्षा रक्षक या विषयांबाबत प्रशिक्षण देण्याची सुविधा आहे. तसेच याबाबत वेळोवेळी प्राप्त झालेल्या सूचनांनूसार नविन विषयांचा समावेश करण्यात येईल. सदर प्रकल्पामध्ये ९० टक्के स्थानिकांना नौकरी देण्यात आली आहे व प्रस्तावित प्रकल्पामध्ये देखील |

| | | |
|---|---|---|
| | दत्तक घेण्यात यावे. सदर प्रस्तावित खाणकामासाठी लागणारे कौशल्य कंपनीने उपलब्ध करून द्यावे. कंपनीने स्थानिकांना खाणकामाचे प्रशिक्षण दिले तर स्थानिक पातळीवर मनुषबळ उपलब्ध होऊ शकतो. भविष्यात होणाऱ्या वायु, जल व इतर प्रकारच्या प्रदूषणामुळे होणाऱ्या नूकसानीची भरपाई करण्यासाठी माझ्या गावाला दत्तक घ्यावे. | त्याचप्रमाणे रोजगारात स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल. सदर खाणीची म.प्र.नि. मंडळाकडुन कोणत्याही प्रकारची बँक हमी जप्त करण्यात आलेली नसून सिमेंट उद्योगाची बँक हमी जप्त करण्यात आली आहे. तसेच पर्यावरण संवर्धनाकरिता कंपनी बांधिल आहे व म.प्र.नि.मंडळाकडून प्राप्त झालेल्या त्रुटींच्या अनुषंगाने अनुपालन करण्यात आले आहे. तसेच रस्ते सफाई मशीन, पाणी फवारणी यंत्रणा व अद्यावत प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसविण्यात आली आहे. आदिवासी समाजाला देखील समाजाच्या मुख्य प्रवाहात आण्याकरिता प्रयत्न करण्यात येत आहे. कंपनीतर्फे ८८० हेक्टर जमीनीपैकी ५७५ हेक्टर जमीन अधिग्रहीत केली आहे व त्यावर खाणकाम करण्यात येणार आहे. भविष्यात जमीनीची गरज भासल्यास त्याबाबत विचार करण्यात येईल. खाण सुरक्षा महानिदेशालयाकडून मान्यता मिळल्यानंतरच खाणीचे विस्तारीकरण करण्यात येते. त्यांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करूनच खाणकाम सुरू करण्यात येते. तसेच खाणीमध्ये उच्च दर्जाच्या सुरक्षा योजनांचे पालन करण्यात येते. बाखर्डी गावाचा सीएसआर निधीमध्ये समावेश करण्याबाबत विचार करण्यात येईल.<br><br>अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर जनसुनावणीदरम्यान स्थानिकांनी त्यांचे प्रश्न उपस्थित करून कंपनीने त्या प्रश्नांना समर्पक उत्तरे द्यावयाचे आहेत. या सर्व बाबींचे इतिवृत्तांत छायाचित्रीकरणासहीत शासनाकडे सादर करण्यात येतील व त्यावर शासन निर्णय घेणार आहे. माझी स्थानिकांना विनंती आहे की त्यांनी पर्यावरण विषयक मुद्दे जनसुनावणीदरम्यान उपस्थित करावे व कंपनी प्रशासन त्याबाबत योग्य ते उत्तर देतील. नौकरी व जमीनीबाबतचे प्रश्न जिल्हा प्रशासन व उद्योग प्रशासन यांच्यामार्फत सोडविण्यात येतील. |

२१) <u>श्री. वामन भिवापुरे, थुट्रा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित केली आहे. परंतु येथे पर्यावरण विषयक मुद्दे व्यतिरिक्त इतर सर्व मुद्दे उपस्थित करण्यात येत आहे. प्रत्येक जनसुनावणीमध्ये नौकरी, मोबदला याबाबतच प्रश्न उपस्थित करण्यात येतात. माझी नागरीकांना विनंती आहे की, नौकरी मोबदल्याबाबतचे मुद्दे मा. जिल्हाधिकारी व कंपनी प्रशासनाची बैठक आयोजित करून निराकरण करण्यात यावे. अंबुजा फाऊंडेशन सन २००० साली स्थापन झाली आहे व तेव्हापासून विकासकामे या क्षेत्रामध्ये सुरू आहे. कोणत्याही प्रकल्पापासून संभाव्य फायदे व तोटे असतात. प्रकल्पामुळे स्थानिक रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या, औद्योगिक विकास झाला, स्थानिक प्रशासनाला खनिज उत्खननातून महसूल प्राप्त झाला व पायाभूत सुविधा प्राप्त झाल्या. सदर प्रकल्प या परिसरात आला नसता तर या क्षेत्राचा विकास झाला नसता. वायु प्रदूषण, जल प्रदूषण व इतर प्रदूषणाबाबत म.प्र.नि. मंडळ व जिल्हाधिकारी यांच्या समवेत चर्चा करून समस्यांचे निराकरण करण्यात यावे. अंबुजा कंपनीतर्फे परिसरातील गावांमध्ये पायाभूत सुविधा पूरविण्यात आल्या आहेत. या परिसरात आणखी ३ उद्योग कार्यरत असून त्यापैकी एकाही उद्योगाने अंबुजासारखे काम या क्षेत्रात केलेले नाही. थुट्रा गावालगत माणिकगड सिमेंटचा प्रकल्प असून उद्योगाच्या प्रदूषणाचा त्रास आमच्या गावाला होत आहे. माणिकगड सिमेंटच्या जनसुनावणीच्या वेळी येथे उपस्थित गडचांदूर येथील लोकप्रतिनिधी माणिकगड कंपनीबाबत स्तुतीसुमने सांगत होते. अंबुजा सिमेंट कंपनीमुळे या परिसरात कोणत्याही प्रकारचे प्रदूषण दिसले नाही. या पसिरामध्ये कंपनीने मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली. तसेच या परिसरातील १२ गावातील शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी चारा उपलब्ध करून दिला. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

२२) **श्री. गणेश सुभाष बोबडे, सोनोली, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अंबुजा फाउंडेशन तर्फे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले आहे. त्यामध्ये प्रशिक्षण देऊन नौकरी उपलब्ध करण्यात येते. माझे औद्योगिक प्रशिक्षण अंबुजा येथील केंद्रात झाले आहे व त्यामुळे मला अंबुजा सिमेंट कंपनीमध्ये नौकरी मिळाली आहे. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

२३) **श्री. गणेश नत्थुजी थिपे, लखमापूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | श्री. निखील भोजेकर यांची जमीन कंपनीने अधिग्रहीत केली आहे परंतु आजपर्यंत त्यांना नौकरी दिलेली नाही. आमच्या शेतीला लागून अंबुजा सिमेंट कंपनीची खाण आहे व तेथे जनावरांचा वावर असून शेतीचे नूकसान होत आहे. त्याची नूकसानीबाबत नूकसान भरपाई मिळालेला नाही. खाणीतुन निघणारी धूळ आमच्या पिकांवर येऊन बसते त्यामुळे पिकांवर फवारणीचा परिणाम होत नाही व उत्पन्न कमी होत आहे. आमच्या गावात ५० बेरोजगार असून त्यांचे अंबुजामार्फत अप्रेंटीस झाले असून आजपर्यंत फक्त १० युवकांना नौकरी मिळाली आहे. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कंपनीने सदर नूकसानीची नोंद घ्यावी व त्यावर योग्य ती उपाययोजना करावी. |

२४) **श्रीमती पुष्पा अनंत मोरे, जिल्हाध्यक्ष, रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले गट), जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे वारंवार प्रदूषणाबाबत तक्रारी नोंदविलेल्या आहे. या परिसिरालगत ५-६ सिमेंट उद्योग व वे.को.लि.च्या कोळसा खाणी आहेत. या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात धूळीचे प्रदूषण होत आहे. तसेच जल प्रदूषण देखील होत आहे. जनावरांसाठी पिण्याचे पाणी शुद्ध नाही. चंद्रपूर जिल्ह्यात प्रदूषणामुळे नागरीकांचे आयुष्य घटलेले आहे. या सर्व गोष्टींसाठी जबाबदार कोण याची माहिती देण्यात यावी. येथील सर्व | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, परिसरातील प्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर योग्य ती कारवाई म.प्र.नि. मंडळाद्वारे करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | कंपन्या आरोग्यासाठी कोणत्या उपाययोजना करत आहेत हा माझा प्रश्न आहे. चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वायु प्रदूषण आहे. तसेच या जिल्ह्यामध्ये जल प्रदूषणाची देखील समस्या आहे. चंद्रपूर व्यतिरिक्त इतर जिल्ह्यांमध्ये प्रदूषणाची पातळी कमी असल्याने तेथील जनावरांचे आरोग्य चांगले आहे. स्थानिकांना नौकरी देखील कंपन्या देत नाहीत. जिल्ह्याच्या बाहेरील व्यक्तिंना प्रकल्पात नौकरी देण्यात येते. कंपनी जमीन अधिग्रहण करून मोबदला देखील व्यवस्थित देत नाहीत. जिल्ह्यातील वाढत्या प्रदूषणाकडे प्रशासनाने लक्ष द्यावे व याबाबत योग्य त्या उपाययोजना कराव्या. माल वाहतूक करणाऱ्या वाहनांमधून मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे त्याबाबत देखील उपाययोजना करण्यात याव्या. | |

२५) **<u>श्री. विवेक बोढे, जिल्हा महामंत्री, भारतीय जनता पार्टी, गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | उद्योग आले तर विकास होईल. या नविन खाण प्रकल्पामध्ये सिलिकाचे प्रमाण खूप जास्त राहणार आहे. श्वसनाद्वारे सदर सिलिका नागरीकांच्या शरीरात जाऊन त्यांना श्वसनाच्या गंभीर आजाराची लागण होणार आहे. याबाबात कंपनी कोणत्या प्रकारच्या उपाययोजना करणार आहेत याची माहिती देण्यात यावी. आमच्या सर्वेक्षणामध्ये सर्वात जास्त श्वसनाच्या आजाराने ग्रस्त नागरीक आढळले आहेत. नौकरी देताना कंपनी महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे ८० टक्के स्थानिकांना नौकरी देत नसल्यामुळे स्थानिक नागरीक नाराज आहेत. याबाबत या क्षेत्राचे आमदार यांच्या निदर्शनास ही बाब आलेली आहे. कंपनीने महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे स्थानिकांना नौकरी उपलब्ध करून द्यावी. तसेच या परिसरात जे व्यवसाय तयार होतील त्यामध्येदेखील ८० टक्के स्थानिकांचा वाटा असायला पाहिजे. आपल्या खनिज वाहतूकीमुळे रस्त्यालगतच्या शेतपिकांचे नूकसान होणार असून नूकसान भरपाईबाबत कंपनीचे असणाऱ्या धोरणाबाबत माहिती देण्यात यावी. खनिजाचे उत्खनन करताना भूगर्भातील पाण्याची पातळी खालावणार आहे त्याबाबत आपल्यातर्फे करण्यात येणाऱ्या | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खाणकाम दरम्यान होणाऱ्या सिलीकाच्या उत्सर्जनाचे प्रमाण १२ टक्क्यांपेक्षा कमी राहते. रस्त्याच्या धुळीमध्ये बऱ्याच प्रमाणात सिलीकाचे प्रमाण असते. कंपनीने वेट ब्लास्टींग प्रक्रियेचे अवलंबन केले आहे. त्यामुळे ब्लास्टींग दरम्यान धुळीचे उत्सर्जन नगण्य प्रमाणात होते व खाणकाम क्षेत्राच्या बाहेर धुळीचे उत्सर्जन होत नाही. अंबुजाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये वीजतंत्री, वेल्डर, फिटर, गेज मशीन व सुरक्षा रक्षक या विषयांबाबत प्रशिक्षण देण्याची सुविधा आहे. तसेच याबाबत वेळोवेळी प्राप्त झालेल्या सूचनांनूसार नविन विषयांचा समावेश करण्यात येईल. त्यामध्ये वाहन चालकाच्या विषयाचा विचार करण्यात येईल. सदर प्रकल्पामध्ये ९० टक्के स्थानिकांना नौकरी देण्यात आली आहे व प्रस्तावित प्रकल्पामध्ये देखील त्याचप्रमाणे रोजगारात स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल. खनिज उत्खननामुळे तयार होणाऱ्या खड्ड्यांमुळे भूजलाच्या पाण्याची पातळी नेहमी वाढतच जाते, त्यात घट होत नाही. खाणीच्या |

| | | |
|---|---|---|
| | उपाययोजनांबाबत माहिती देण्यात यावी. कंपनीने जमीन अधिग्रहणाबाबत सुरूवातीलाच स्पष्टीकरण द्यायला पाहिजे होते की सदर प्रकल्पामध्ये कोणत्याही प्रकारे जमीन अधिग्रहीत करण्यात येणार नसून अस्तित्वात असलेल्या क्षेत्रामध्ये वाढीव उत्खनन करण्यात येणार आहे. या क्षेत्रात शेतीच्या उत्पन्नावर आधारित नागरीक आहेत. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहीत करण्यात आली आहे त्यांना नौकरी उपलब्ध करून देण्यात आला नाही. अंबुजा सिमेंट उद्योगाने फक्त महिला सशक्तिकरणाकडे लक्ष दिले आहे. त्यामुळे स्थानिक पुरूष वर्ग नाराज आहे. कंपनीने स्थानिक युवकांसाठी कौशल्य विकास केंद्र स्थापित करावे. त्यामध्ये वाहन चालविण्याचे प्रशिक्षण द्यावे व प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना कंपनीमध्ये नौकरी द्यावी. पर्यावरणाचा ऱ्हास होत असेल तर येते चालणार नाही. सीएसआर निधी कुठे खर्च करण्यात आला याचे विवरण कंपनीने ग्रामपंचायतीकडे इंग्रजीमध्ये सादर केले. कंपनीने ग्रामपंचायतीला मराठी भाषेत सदर विवरण सादर करावे. त्यामध्ये कोणत्या ग्रामपंचायतीला किती सीएसआर निधी दिला व पर्यावरणावर किती खर्च करण्यात प्रस्तावित आहे याची माहिती देण्यात यावी. तसेच कंपनीने दत्तक घेतलेल्या गावाच्या ग्रामपंचायतींना गावातील प्रस्तावित विकासकामांबाबत ध्वनिचित्रफित किंवा सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात यावी जेणेकरून गावकऱ्यांचे समाधान होईल. ब्लास्टींगद्वारे खाणकाम करण्यात येते. ब्लास्टींगमुळे लगतच्या घरांना तडे जातात व त्यांचे नूकसान होते. कंपनीची ब्लास्टींगमुळे होणारे नूकसान टाळण्याबाबत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती द्यावी. सदर कंपनीच्या चुनखडी खाण क्षेत्रातील गावाचे पुनर्वसन करण्यात आले व सोनापूर बस स्थानकाजवळ १ एकर क्षेत्रामध्ये रामपूर या नावाने पुनर्वसन करण्यात आले आहे परंतु तेथे कोणत्याही सुविधा पूरिवण्यात आलेल्या नाहीत. कंपनीने रामपूर गावातील नागरीकांसाठी सर्व प्रकारच्या सुविधा पूरवाव्यात. सोनापूर गावाजवळ कंपनीचे मॅगझीनचे गोदाम आहे, तेथे कोणत्याही प्रकारचे संरक्षक उपाय करण्यात आले नाही. त्याबाबत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती देण्यात यावी. ब्लास्टींगमुळे वातावरणात सिलिआचे प्रमाण वाढते व त्यामुळे श्वसनाचे गंभीर आजार होण्याची शक्यता आहे. याबाबत कंपनीचा आरोग्य विषयक आराखडा मराठी | खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी जमा होते व त्यामुळे भूजलाची पातळीमध्ये वाढ होते. सदर प्रस्तावित प्रकल्पामध्ये कोणत्याही प्रकारची जमीन अधिग्रहीत करण्यात येणार नाही. प्रस्तावित प्रकल्पामध्ये खनिज उत्पादनात वाढ होणार आहे. कंपनीने सीएसआर अंतर्गत ₹ ४.० कोटींची तरतूद केलेली आहे. त्यामध्ये परिसरातील सर्व गावांचा समावेश करण्यात येईल. खाणीमध्ये होणारी सर्व प्रकारची कामे खाण सुरक्षा महानिदेशालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानूसारच करण्यात येतो. सदर मार्गदर्शक तत्त्वानूसार मॅगझीन साठणूक केंद्रापासून किमान ६५० मीटरचे बफर झोन ठेवायचे असते. आमच्या मॅगझीन साठवणूक केंद्रापासून किमान ८०० मीटरचा बफर झोन ठेवण्यात आला आहे. मॅगझीनची वेळोवेळी तपासणी केली जाते व सर्व मानकांची पूर्तता केल्यावरच परवानगी दिली जाते. कंपनीचे डॉक्टर्स सर्व गावांमध्ये जाऊन नागरीकांच्या आरोग्याची तपासणी करतात व त्याप्रमाणे औषधींचे वाटप करण्यात येते व यामध्ये आपल्यासोबत चर्चा करुन आणखी सुधारणा करण्यात येईल. पगडीगुंडम धरणातून पाणी उपसा करण्याबाबत करार झालेला आहे. परंतु या खाणीतून निघणाऱ्या खाणपाण्याचाच धुळ दडपण्यासाठी पुनर्वापर करण्यात येत आहे. पगडीगुंडम धरणातील पाण्याचा वापर करण्यात येत नाही. खाणीच्या खड्ड्यात जमा झालेले खाणपाण्यामुळे परिसरातील भूजलाच्या पातळीमध्ये वाढ होण्यास मदत होत आहे. उप-वनसंरक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरातील वन्य प्राण्यांबाबत सर्वेक्षण करण्यात आले होते व त्यादरम्यान परिसरात बिबट्या सारखे जनावरांच्या हालचालीची बाब निदर्शनास आली नाही. वन्यजीव संवर्धनाबाबतचा आराखडा वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात येतो. |

| | | |
|---|---|---|
| | भाषेत तयार करून परिसरातील सर्व ग्रामपंचायतींना देण्यात यावे. तसेच याबाबत पत्रिका वितरीत करून माहिती देण्यात यावी. उपरोक्त सर्व मुद्यांबाबत कंपनीने अंमलबजावणी न केल्यास कंपनी व स्थानिकांमध्ये संघर्ष होईल व त्याची जबाबदारी कंपनीची राहणार. | |

**२६) <u>श्री. निखील सुधाकर भोजेकर, लखमापूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | श्री. सुधाकर भोजेकर यांची शेतजमीन स. नं. ४० सन १९९९-२००० दरम्यान मे. अंबुजा सिमेंट कंपनी व पूर्वीची मराठा सिमेंट वर्क्स यांच्यातर्फे संपाहदत करण्यात आली होती. सदर करारामध्ये प्रकल्पग्रस्त नागरीकांना वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये नौकरी देण्याचे लेखी नमूद करण्यात आले होते. परंतु आजपर्यंत अनेक प्रकल्पबाधितांना प्रकलपामध्ये स्थायी नौकरी देण्यात आली नाही. आमचा या जनसुनावणीला विरोध आहे. आमच्या बेरोजगार प्रकल्पग्रस्तांतर्फे चंद्रपूर जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते चंद्रपूर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तसेच जनविकास सेनेचे संस्थाप अध्यक्ष माननीय प्रदीप ऊर्फ पप्पू देशमुख यांनी दि. ०४/०५/२०२३ रोजी भेंडवी येथे आयोजित जनसुनावणीला प्रत्यक्ष उपस्थित राहून त्या जनसुनावणीच्या विरोधात जे मुद्दे मांडले होते, त्याची साक्षांकित लेखी प्रत मी यावेळी आपणांस देत आहे. जन सुनावणीला उपस्थित शासनाच्या, प्रशासनाच्या सर्व प्रतिनिधींनी, कंपनीच्या प्रतिनिधींनी व इतर शासकीय विभागाच्या प्रतिनिधींनी या लेखी प्रतीचे अवलोकन करावे अशी माझी विनंती आहे. भेंडवीप्रमाणेच आज लखमापूर येथे आयोजित जनसुनावणीसुद्धा बेकायदेशीर आहे. नियम डावलून शासनाने, जिल्हा प्रशासनाने व प्रदूषण विभागाने या जनसुनावणीचे आयोजन केले आहे. मुळात मेसर्स अंबुजा सिमेंट कंपनीने भूसंपादन कराराचा भंग केल्याचे शासनाने व जिल्हा प्रशासनाने मान्य करून त्या अनुषंगाने कंपनीला भूसंपादन करार रद्द करण्याबाबत अनेक वेळा नोटीस पाठवली आहे. काहीही कारण नसतांना शासन व जिल्हा प्रशासनाने भूसंपादन करार रद्द करण्याची कार्यवाही मागील सुमारे अडीच वर्षापासून प्रलंबित ठेवली आहे. बेकायदेशीरपणे नियम डावलून जिलहा प्रशासन, शासन | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | अंबुजा सिमेंट कंपनीला पाठीशी घालत आहे. त्या कंपनी करिता आयोजित जनसुनावणी बेकायदेशीर असल्याने ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी अशी भूमिका आमच्यातर्फे श्री. प्रदीप देशमुख यांनी भेंडवी येथे दि. ०४/०५/२०२३ रोजी आयोजित सुनावणीमध्ये मांडली होती. तरीसुद्धा तेव्हाच्या जनसुनावणीच्या अनुषंगाने अंबुजा सिमेंट कंपनीच्या विस्तारीत प्रकल्पाला मंजूरी देण्याचे बेकायदेशीर काम जिल्हा प्रशासन व शासनाने केले. यावरून असे लक्षात येते की, बेकायदेशीरपणे नियम डावलून जिल्हा प्रशासन व शासनाने जनसुनावणीचे आयोजन केले, तसेच शासन व प्रशासनाला लेखी पुरावे देऊन तत्कालीन जनसुनावणी रद्द करण्याची मागणी करूनही, प्रदूषण नियंत्रण विभाग, जिल्हा प्रशासन व शासनाने मात्र कंपनीच्या विस्तारीत प्रकल्पाला मंजूरी दिली. याही पुढे जाऊन आज दिनांक ३ फेब्रुवारी २०२५ रोजी शासनाने या दिवशी त्याच कंपनीच्या म्हणजेच मेसर्स अंबुजा सिमेंट कंपनी उपरवाहीच्या पुन्हा एका विस्तारीत प्रकल्पाकरिता आज लखमापूर येथे ही जनसुनावणी आयोजित केली आहे. एकीकडे या कंपनीचा भूसंपादन करार रद्द करण्याची कार्यवाही पूर्ण झालेली असताना अडीच वर्षापासून त्याची अंमलबजावणी न करणे, व दुसरीकडे वारंवार नियम डावलून बेकायदेशीरपणे या कंपनीच्या विस्तारीत प्रकल्पाकरिता पुन्हा पुन्हा जनसुनावणी आयोजित करणे, ही जिल्हा प्रशासन शासन व प्रदूषण नियंत्रण विभागाची भूमिका शेका निर्माण करणारी आहे. सदर कंपनीकडून आर्थिक लाभ मिळवून किंवा गैर मार्गाने इतर प्रकारचा कोणताही लाभ मिळवून शासनाचे मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी, जिल्हा प्रशासनातील अधिकारी किंवा प्रदूषण नियंत्रण विभागातील अधिकारी अशा पद्धतीने बेकायदेशीर जनसुनावणी आयोजित करून, विस्तारीत प्रकल्पांना मंजूरी देण्यासाठी सदर कंपनीला सहकार्य करीत असल्याची शंका निर्माण होण्यास वाव आहे. आज काही व्यक्तिगत कारणास्तव प्रकल्पग्रस्तांचे नेते श्री प्रदीप देशमुख या जनसुनावणीला उपस्थित राहू शकले नाही. मी त्यांच्यातर्फे तसेच वर नमूद केल्याप्रमाणे या कंपनीमुळे भूमीहीन झालेल्या आदिवासी व गैर-आदिवासी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांतर्फे पुन्हा एकदा मागणी करतो की, आजची जनसुनावणी सुद्धा बेकायदेशीर असून जिल्हा | |

| | | |
|---|---|---|
| | प्रशासन, शासन व प्रदूषण नियंत्रण विभागाने ही जनसुनावणी रद्द कराव तसेच यापूर्वी भेंडवी येथे झालेल्या जनसुनावणीच्या अनुषंगाने विस्तारीत प्रकल्पाला दिलेली मंजूरी सुद्धा रद्द करावी. मी नम्रपणे नमूद करू इच्छितो की जर या दोन्ही जनसुनावणीच्या विरोधात योग्य कारवाई केली नाही तर आम्हाला प्रकल्पाग्रस्तांना बेकायदेशीर नियमबाह्य जनसुनावणीचे आयोजन करणाऱ्या शासनातील वरिष्ठ अधिकारी, जिल्हा प्रशासन व प्रदूषण नियंत्रण विभागातील अधिकारी यांच्याविरूद्ध फौजदारी कार्यवाही करण्याकरिता योग्य त्या ठिकाणी दाद मागावी लागेल. करिता मी मांडलेल्या प्रत्येक मुद्याची योग्य दखील घ्यावी व त्याची नोंद जनसुनावणीच्या इतिवृत्तात करून त्या अनुषंगाने नियमानूसार कार्यवाही करावी ही विनंती. | |

२७) **<u>श्री. किशोर हौजकर, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अंबुजा सिमेट फाऊंडेशन तर्फे मला औद्योगिक प्रशिक्षण प्रापत झाले. अंबुजा सिमेंटने मोठ्या प्रमाणात सदर परिसरात वृक्ष लागवड केलेली आहे. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

२८) **<u>श्री. अरविंद डोहे, नगर सेवक, गडचांदूर महानगरपालिका, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या परिसरात अंबुजा, अल्ट्राटेक, एल ॲण्ड टी सिमेंट अशा तीन सिमेंट उद्योग आहे. या तीन्ही सिमेंट उद्योगामुळे येथे मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण, वायु प्रदूषण धूळ प्रदूषण होत आहे. या प्रदूषणामुळे येथील नागरीकांच्या आरोग्यावर मोठा परिणाम झाला असून त्वचेचा, कानाचे डोळ्याचे फुफ्फुसाचे रोगांनी अनेकांना ग्रासले आहे. तसेच येथील परिसरातील शेत मालावरसुद्धा डस्ट प्रदूषणामुळे मोठा परिणाम होत आहेच. आता नव्याने या ठिकाणी चुनखडी उत्खनन झाल्यास प्रदूषणात वाढ होऊन मानवी जिवितास तसेच पर्यावरणास धोका निर्माण होऊ शकते करिता सदर प्रकल्पास माझा तीव्र विरोध आहे. तरी आपला प्रकल्प सुरू झाल्यास लीज क्षेत्र बाधित झालेल्या मुलांना रोजगारात प्रथम प्राधान्य देण्यात येईल काय? | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | ग्रामपंचायत/नगर परिषदेच्या माध्यमातून स्थानिक लोकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनूसार ८० टक्के राखीव कोटाच्या माध्यमातून नौकरी उपलब्ध होणार काय? कंपनीचे खाणकाम व ब्लास्टींग व्हायब्रेशनमुहे लीज क्षेत्राच्या आजूबाजूला असलेल्या बोरवेल कोलमडून पाण्याच्या पातळीमध्ये घट होऊन प्रकल्पग्रस्ताचे आर्थिक नूकसान होणार आहे. त्याकरिता नूकसान भरपाईची तरतूद करण्यात आली आहे काय? खनिज वाहतूक करताना धुळ प्रदूषण होऊन रस्त्याच्या आजुबाजूच्या शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे नूकसान होऊ शकते. त्याकरिता नूकसान भरपाईची तरतूद करण्यात आली आहे काय? ग्रामपंचायत व नगर परिषदमधील गावांच्या विकासासाठी सीएसआर निधीमध्ये तरतूद करण्यात आली आहे काय? कंपनीने इतर गांवाना दत्तक घेऊन सीएसआर निधीमार्फत विकासकामे केली आहेत, त्याचप्रमाणे गडचांदूर शहराला देखील दत्तक घेऊन त्या ठिकाणी सीएसआर निधीमार्फत विकास कामे करावी. दत्तक गावातील नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या उपाययोजना करण्यात याव्या. ब्लास्टींगमुळे गावातील घरांना हादरा बसून घराचे नूकसान झाल्यास त्याबाबत नूकसान भरपाईच्या तरतूदीबाबत माहिती द्यावी. | |

२९) **<u>श्री. शंकर तोडासे, सरपंच, ग्रामपंचायत मंगी (बु.), ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | परिसरातील इतर कंपन्यांच्या तुलनेत अंबुजा सिमेंट कंपनीने स्थानिक ३०० लोकांना नौकरी उपलब्ध करून दिली आहे. अंबुजा सिमेंटमार्फत शेतीचे उत्पन्न वाढविण्याबाबत, पाण्याची गुणवत्ता व जमीनीची सुपिकता कायम ठेवण्यासाठी मार्गदर्शन करत आहेत. परिसरात शिक्षण, आरोग्य व महिला सक्षमीकरणासंदर्भात कंपनीने कार्य केले आहे. प्रत्येक गावात वृक्ष लागवडीबाबत योजना राबविलेल्या आहेत. माझ्या गावात ऑक्सीजन प्लांट उभारला आहे. तसेच ६००० झाडांची लागवड केलेली आहे. मी माझ्या गावातील ८० लोकांना नौकरी दिलेली आहे. कंपनीच्या प्रयत्नांमुळे माझे गांव स्मार्ट विलेज योजनेमध्ये सहभागी झालेला आहे. तसेच माझी वसुंधरा अभियानामध्ये माझ्या गावाला पुरस्कार देखील प्राप्त | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | झालेला आहे. कंपनीने सदर प्रस्तावित चुनखडी खाणीमध्ये प्रकल्पग्रस्तांना नौकरी द्यावी. कंपनीने खाणीलगतच्या २००-३०० मीटर जागेवर बफर झोन तयार करून तेथे धुळ दडपण्यासाठी ऊंच झाडांची लागवड करावी. त्यामुळे शेतपिकांचे नूकसान होणार नाही. खाणीतर्फे मिळणारा जिल्हा खनिज निधी परिसरातील ग्रामपंचायतींसाठी किमान ५० टक्के आरक्षित करावा. | |

**३०) सौ. संजीवनी पेरगामी, हरदोना, ता. राजूरा, जि. चंद्रपूरः-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अंबुजा सिमेंट कंपनीने परिसरात आरोग्य विषयक सुविधा पूरविलेल्या आहेत. कंपनीने परिसरामध्ये आरोग्य शिबीरांचे आयोजन केले आहे. सदर प्रस्तावित प्रकल्पाला आमचा पाठिंबा आहे. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

**३१) सौ. सुनंदा सतिश शिंदे, हरदोना, ता. राजूरा, जि. चंद्रपूरः-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या गावात शासकीय योजना व अंबुजा सिमेंट फाऊंडेशनच्या सहाय्याने एकता स्वयंसहायता संस्थेने उर्वरित २८ घरांमध्ये शौचालय बांधून देण्यात आले. तसेच परिसरातील १२ गावातील ५६० घरांमध्ये शौचालयाचे बांधकाम करून दिले. अंबुजा सिमेंट फाऊंडशनतर्फे आमच्या गावामध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा पूरविण्यात आली. आमच्या गावामध्ये दवाखाना बांधून दिला आहे. तसेच परिसरामध्ये गरीब मुलांच्या शिक्षणासाठी पुस्तक परीची नेमणूक केलेली आहे. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

**३२) श्री. विजय आदंनराव पिदुरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य, ता. वणी, जि. यवतमाळः-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | २६१ हेक्टर नव्याने अधिग्रहण करताना जमीन अधिग्रहण कायदा २०१३ प्रमाणे आजचा चालु रेडीरेकनर दराप्रमाणे भूसंपादन करून जमीनीचा भाव व प्रकल्पग्रस्त | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, पर्यावरणाविषयक मुद्दे जनसुनावणीदरम्यान मांडण्यात यावे. सदर |

| | | |
|---|---|---|
| | भूधारकाला कंपनीमध्ये शिक्षणानुसार नौकरी देण्यात यावी. नव्याने अधिग्रहणामध्ये ९५ नौकऱ्या यामध्ये अकुशल, अर्धकुशल ९२ असे कार्यकारी सारांश माहिती फक्त ५ लोकांना कंपनी रोजगारात घेणार यामध्ये गावातील तांत्रिक, वैद्यकीय व विविध विषयात उच्च शिक्षण घेतलेल्या प्रकल्पग्रस्तांचे सर्वेक्षण करण्यात आले नाही. त्याबाबत माहिती देण्यात यावी. सदर कंपनीत यापूर्वी पर्यावरण संरक्षणाकरिता हरीत पट्ट्यामध्ये कडूनिंब, आपटा, करंज, शिरस, अशोका, बांबू, वड, पिंपळ, इत्यादी देशी झाडांची लागवड किती क्षेत्रुळावर व कधी केली यापैकी किती झाडे जिवंत आहे याचे स्पष्टीकरण द्यावे. कंपनीचे उत्खनन व ब्लास्टींग व्हायब्रेशन दळण-वळण मुळे लीज क्षेत्र आजुबाजूला असलेल्या बोअरवेल पाणी पातळी कमी होणे, परिणामी सिंचीत क्षेत्र न झाल्याने उत्पन्नात घट याची आर्थिक भरपाई कंपनीच्या वतीने प्रकलपाच्या लगत नूकसानग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात यावी. कंपनीद्वारे खनिज वाहतूक करताना धूळ प्रदूषणामुळे रस्त्याच्या आजुबाजूला शेतकऱ्यांचे शेत पिकांची नूकसान होते कृषी विभागाकडून सर्वेक्षण करून उत्पादनानूसार बाजार भावाप्रमाणे शेतकऱ्यांना नूकसान भरपाई कंपनीने द्यावी. कंपनीच्या वतीने भूसंपादन गावातील शिक्षीत बेरोजगारांना नौकरी मेळावा घेण्यात आला आहे का? सामाजिक आर्थिक सर्वेक्षण अहवाल ई.आय.ए. रिपोर्टमध्ये जोडले नाही. याचे स्पष्टीकरण द्यावे. पर्यावरणात दोन भाग करण्याचे सांगितले कोअर झोन, बफर झोन, याचे काय बजेट राहणार कंपनीच्या वन्य प्राणी जैवविविधतेवर होणाऱ्या परिणामाची माहिती देण्यात यावी. सी.एस.आर मधून कोरोना काळ २०२०-२१, २०२१-२२ मध्ये आरोग्य खर्च कमी दिसतो आणि नंतर वाढलेला यांचे मापदंड काय आहे. | जनसुनावणीदरम्यान नागरीकांचे प्रकल्पाविषयीचे मत नोंदविण्यात येतात व त्याचे छायाचित्रीकरण करून ईतिवृत्तांतामध्ये नोंद घेण्यात येते. येथे कोणत्याही प्रकारचे फौजदारी गुन्हे दाखल करता येत नाही. |

**३३) श्री. आशिष देरकर, तालुका प्रतिनिधी, दैनिक लोकमत, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्ही येथे कितीही तक्रारी केल्या तरी सदर कंपनीला पर्यावरणीय मंजूरी प्राप्त होणार आहे. अंबुजा सिमेंट कंपनीने कोरपना तालुक्यातील इतर सिमेंट कंपन्यांच्या तुलनेत चांगले काम केले आहे. कोरपना तालुक्यातील | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | अंबुजा, माणिकगड, अल्ट्राटेक व दालमिया असे ४ सिमेंट उद्योग कार्यरत आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा या ४ ही सिमेंट उद्योगांवर कोणत्याही प्रकारचा वचक नसल्याने या परिसरात मोठ्या प्रमाणात वायु, जल व ध्वनी प्रदूषण होऊन आमच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. माझी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला विनंती आहे की त्यांनी कोरपना तालुक्यातील ४ सिमेंट उद्योगांवर मोठ्या प्रमाणात कार्यवाही करावी जेणेकरून परिसरातील प्रदूषण कमी होईल. दोन वर्षांपूर्वी गडचांदूर शहरातील रहिवासीयांनी माणिकगड सिमेंटच्या प्रदूषणाबाबत लढा उभारण्यात आला होता. तरी देखील प्रदूषण नियंत्रण मंडळाने माणिकगड सिमेंट कंपनीवर कोणत्याही प्रकारची ठोस कारवाई केलेली नाही. कंपनीने सीएसआर निधीमधून स्थानिकांना सुविधा पूरविण्याबाबत करण्यात येणाऱ्या खर्चामध्ये कपात केली व प्रदूषण नियंत्रणाबाबत खर्च वाढविला तर स्थानिक जनतेचे आरोग्य सुरक्षित राहणार. स्थानिकांमध्ये कर्करोगाचे संक्रमण वाढलेले असून त्याकरिता फक्त कंपनी दोषी नसून कंपनीला आधार देणारे प्रदूषण नियंत्रण मंडळ देखील दोषी आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्थानिकांच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात खनिज संपत्ती उपलब्ध असल्यामुळे खाणकाम करण्यात येते. त्यामुळे या क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात खनिज विकास निधी शासनास प्राप्त होतो. परंतु या क्षेत्रात खनिज विकास निधीचा वापर करण्यात येत नाही. खनिज विकास निधीचा इतर ठिकाणच्या विकासासाठी उपयोग करण्यात येतो. खनिज विकास निधीचा किमान ६० टक्के निधी कोरपना तालुक्यातील गडचांदूर व इतर गावांकरिता खर्च करण्यात यावा. मा. जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की त्यांनी खनिज विकास निधीचा वापर या क्षेत्रातील विकास कामांकरिता खर्च करावा. | |

**३४)श्री. गौतम भासारकर, अध्यक्ष, पंचशील संस्था, गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या परिसरात अंबुजा सिमेंट कंपनीने शेतात जाण्याकरिता पांदण रस्त्यांचे दुरूस्तीकरणाचे काम केले आहे. सदर कंपनीचे पर्यावरणासंबंधिचे काम | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, पर्यावरण विषयक मुद्दे किंवा अडचणी असल्यास उपस्थित करण्यात यावे. |

| | | |
|---|---|---|
| | वाखाणण्यासारखे आहे. परंतु या क्षेत्रातील दैनिक वृत्तपत्रामध्ये मे. अंबुजा सिमेंट कंपनीला बदनाम करण्यासाठी प्रदूषणविषयक बातम्या प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत. अशा बातम्यांमुळे या क्षेत्रातील वातावरण कसे खराब करता येईल याबाबत प्रयत्न करण्यात येत आहे. या परिसरात अल्ट्राटेक सिमेंट युनिट माणिकगड या उद्योगाच्या प्रदूषणाबाबत दि. २८/०९/२०२४ रोजी बातमी प्रकाशित झाली होती व त्यानंतर याबाबत कोणतीही बातमी प्रकाशित करण्यात आलेली नाही. प्रदूषण अल्ट्राटेक सिमेंट मुळे होत असताना त्याबाबत अंबुजा सिमेंटला जबाबदार का धरायचं? या परिसरात अंबुजा सिमेंट कंपनीकडुन सुविधा पूरविण्यात येतात. उर्वरित सिमेंट कंपन्यांनी या परिसरात कोणत्याही सुविधा पूरविलेल्या नाहीत. अंबुजा सिमेंट कंपनीने फिरत्या दवाखान्यांची सुविधा पूरविलेली आहे. | |

**३५) <u>श्री. अंकुश सलाम, सदस्य, ग्रामपंचायत भेंडवी, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | भेंडवी गाव फक्त १ किमी अंतरावर स्थित आहे. कंपनीने स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. अंबुजा सिमेंट कंपनी परिसरातील इतर कंपन्यांच्या तुलनेत प्रदूषण नियंत्रणाच्या बाबतीत चांगले काम करते. अंबुजा सिमेंट मार्फत माझ्या गावामध्ये शेततळ्यांचे बांधकाम करून देण्यात आले आहेत. अंबुजा सिमेंट कंपनीने माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत गावातील विकास कामे करण्याकरिता मदत केली आहे. त्यामुळे भेंडवी या गावाला नागपूर विभागीय स्तरावर तीसरा क्रमांक मिळाला आहे. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, पर्यावरण विषयक मुद्दे किंवा अडचणी असल्यास उपस्थित करण्यात यावे. |

**३६) <u>श्री. दिनकर पावडे, सुकळी, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अंबुजा सिमेंट कंपनीने कार्यकारी सारांशमध्ये १७ मुद्यांची नोंद घेतली आहे व त्याची अंमलबजावणी करण्यात येईल असे सांगितले आहे. सदर सारांशामध्ये प्रति हेक्टर २००० झाडे लावून खाणीच्या सभोवतीली हरीत पट्टा निर्माण करणार असल्याचे प्रस्तावित आहे. सदर वृक्ष | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, पर्यावरण विषयक मुद्दे किंवा अडचणी असल्यास उपस्थित करण्यात यावे. |

| | | |
|---|---|---|
| | लागवडीदरम्यान किती ऊंचीचे वृक्ष लावण्यात येतील याची माहिती देण्यात यावी. ५० चौ.फुट क्षेत्रात एक वृक्ष लावण्याचे प्रस्तावित आहे. म्हणजेच किमान २ लक्ष वृक्ष या क्षेत्रा लावण्यात येतील काय, हा प्रश्न आहे. सारांशमध्ये ८२ प्राण्याच्या प्रजातीचा उल्लेख केलेला आहे. परंतु खनिजाच्या उत्खननामुळे येथील प्राणी लगतच्या शेतात जाऊन शेतपिकांचे नूकसान करत आहेत. वन्यजीव संवर्धनाबाबत केलेल्या उपाययोजनांची माहिती देण्यात यावी. वृक्ष लागवड करताना त्यामध्ये फळझाडे, बांबू, कडुनिंब या झाडांचा समावेश करावा. खाणीपासून १५० मीटर अंतरावर पिंपळगाव हे गाव स्थित आहे. खाण सुरक्षा महानिदेशालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार १५० मीटर अंतरावर खाणकाम करता येत नाही. त्याबाबत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती द्यावी. खाणीलगत असणाऱ्या गावांचे पुनर्वसनाबाबत कंपनीने विचार करावा. या क्षेत्रातून चुनखडीच्या उत्खननातून शासनास मोठ्या प्रमाणात खनिज महसूल प्राप्त होणार आहे. शासनाने खनिज महसूलाचा स्थानिकांच्या विकासासाठी वापर करावा. माझी अध्यक्ष यांना विनंती आहे की, कंपनीने मागील जनसुनावणीदरम्यान दिलेल्या आश्वसनांची पूर्तता केली नसल्यास ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी. सदर प्रकल्पामध्ये १.० लक्ष लिटर पाण्याची धुळीचे प्रदूषण थांबवण्याकरिता गरज असणार आहे. परंतु इतक्या मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. | |

**३७)श्री. गोपाल कोटनाके, सोनापूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सालेगुडा गावापासून १० मीटर अंतरावर खाण क्षेत्र आहे परंतु त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचे कुंपण नाही. त्यामुळे त्या खाणीच्या खड्ड्यात जनावरे किंवा माणसे पडणार नाहीत व कोणतेही नूकसान होणार नाही. तेथे सुरक्षारक्षक देखील उपलब्ध करून द्यावे. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, खाणीच्या खड्ड्याच्या सभोवताल कुंपण करावे. |

३८) **श्री. राजकुमार बावणे, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर खाणीमुळे गावाचा विकास होणार आहे व स्थानिकांना नौकरी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे माझे या प्रकल्पास समर्थन आहे. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

३९) **श्री. सौरभ राऊत, थुट्रा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी अंबुजा सिमेंट कंपनीमध्ये शिकऊ उमेदवार आहे. कंपनीच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये माझे शिक्षण पूर्ण झाले. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

४०)**श्री. अनिल श्रीधर कौरासे, उप-सरपंच, ग्रामपंचायत उप्परवाही, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अंबुजा सिमेंटमुळे प्रदूषण होत नाही. या क्षेत्रात माणिकगड सिमेंट कंपनीच्या धुळीचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात आहे. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

४१) **श्री. रूपेश मुकुंद रोहणे, गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जनसुनावणीला माझा पाठिंबा आहे. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

४२)**श्री. पुरूषोत्तम निब्रड, गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सद्य:स्थितीत भूजलाची पातळी मोठ्या प्रमाणात खालावलेली आहे. भूजलाची पातळी वाढवण्याकरिता कंपनीतर्फे करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत लेखी आश्वासन देण्यात यावे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आर्थिक बाबी व सीएसआरबाबत मुद्दे असल्यास त्याबाबत लेखी |

| | | |
|---|---|---|
| | मंडळाने भूजलाची पातळी ऊंचावल्याबाबत परिक्षण करावे. स्थानिकांना नौकरी उपलब्ध करून द्यावी. नूकत्याच पार पडलेल्या हिराई महोत्सवादरम्यान असे निदर्शनास आले की स्थानिक बचत गटांना बँकेकडून वित्तीय सहायता घ्यावी लागली. माझा कंपनीला प्रश्न आहे की त्यांनी खरोखरच स्थानिक बचत गटांची मदत केली आहे किंवा कसे. ब्लास्टींगमुळे होणारे नूकसान टाळण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती देण्यात यावी. खनिजाच्या वाहतूकीमुळे रस्त्यालगतच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नूकसान होत असून कंपनीने शेतकऱ्यांना पर्यावरण भत्ता द्यावा. | निवेदन देण्यात यावे. पर्यावरण विषयक मुद्दे येथे उपस्थित करण्यात यावे. |

४३) **श्री. डांगे, सदस्य, ग्रामपंचायत थुट्रा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीच्या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये १२ गावातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्यात यावे. शिकाऊ उमेदवारांना शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कंपनीमध्ये नौकरी देण्यात यावी. कंपनीने सर्व १२ ग्रामपंचायतींसाबेत बैठक घेऊन त्यांच्या समस्या समजून घेऊन त्यावर तोडगा काढावा. कंपनीच्या खनिज वाहतूकीमुळे किमान ५० शेतकऱ्यांचे नूकसान होत आहे. त्यांना नूकसान भरपाई देण्यात यावी. सदर चुनखडी अस्तित्वात असलेल्या सिमेंट उद्योगात वापरण्यात यावा. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, पर्यावरण विषयक मुद्दे येथे उपस्थित करण्यात यावे. |

४४) **श्री. संदीप तुकाराम बावणे, लखमापूर, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीला विनंती आहे की त्यांनी रस्त्यालगत झाडे लावावी जेणेकरून शेतपिकांवर धुळीचा प्रादुर्भाव होणार नाही. कंपनीची चुनखडी करणाऱ्या वाहनांची वेग मर्यादा निश्चित करून देण्यात यावी जेणेकरून रस्त्यावर अपघातांच्या प्रमाणात घट होईल. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

४५) **श्री. भास्कर वडस्कर, लखमापूर, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीच्या वायु प्रदूषणाचा त्रास संपूर्ण गावाला होत आहे परंतु कंपनीने याबाबत कोणत्याही उपाययोजना केलेल्या नाहीत. परिसरातील प्रदूषणाच्या प्रमाणात घट झाली पाहिजे. कंपनीच्या परिसरात येणाऱ्या जनावरांमुळे शेतीचे नूकसान होत आहे. त्याची नूकसान भरपाई कंपनीने द्यावी. कंपनीने स्थानिकांना नौकरी उपलब्ध करून दिली पाहिजे. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

४६) **श्री. अरूण जुमनाके, सरपंच, ग्रामपंचायत लखमापूर, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | लखमापूर गावात सन २००८-२०१० पासून कंपनी कार्यरत आहे. सदर परिसरात पाण्याच्या टंचाईची समस्या आहे. शासनाच्या बोरवेलचे पाणी देखील संपलेले आहे. भूजलाची पातळी खालावलेली आहे. कंपनीने भूजलाची पातळी वाढविण्याबाबत उपाययोजना करावी. शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे धुळीमुळे नूकसान झाले असून कंपनीने त्यांना मोबदला दिला पाहिजे. लखमापूर ते पिंपळगावाला जाणारे दोन रस्ते बंद करण्यात येऊ नये. कंपनीच्या प्रवेशद्वाराजवळ पावसाळ्यात चिखल होऊन अपघात होतात. त्याबाबत कंपनीने उपाययोजना करावी. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

४७) **श्री. वासुदेव बल्की, उप्परवाही, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीतर्फे सर्व बाबींची पूर्तता करण्यात येईल काय? | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

४८) **श्री. शंकर आत्राम, सरपंच, ग्रामपंचायत कुक्कुडसात, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वृक्ष लागवड करत असताना कामगारांसाठी तरतूद करण्यात यावी. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

४९) **इंजि. श्री. सुरज आगलावे, गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | खाणकाम झाल्यानंतर भूभरणासाठी कोणत्या प्रकारची उपाययोजना करण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

५०) **श्री. सुधीर देवराव थिपे, शिक्षक, गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | लखमापूर गावात तलावाची सुविधा नाही, शेततळे उपलब्ध नाहीत, त्यामुळे गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात आहे. जल, जंगल व जमीनीचे संवर्धन होणे गरजेचे आहे. कंपनीने वृक्षारोपण केले असले तरी त्यांचे संवर्धन करणे ही गावकऱ्यांची जबाबदारी आहे. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

**जनसुनावणीमध्ये ऑनलाईन प्रणालीद्वारे सहभागी झालेले व्यक्ति खालीलप्रमाणे आहे:-**

५१) **श्री. वैभव मोरेश्वर बदखल, गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनी खाणक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी व त्याचे संगोपन करावे. कंपनीने भूजलाची पातळी वाढविण्याबाबत उपययोजना करावी. कंपनीने मानधन पद्धतीने शेतकऱ्यांना वृक्ष लागवड करण्याकरिता झाडे उपलब्ध करून द्यावी जेणेकरून प्रदूषणाचा त्रास होणार नाही. सद्य:स्थितीत कंपनीने खाण क्षेत्राला कुंपण पूरविलेले आहे. | सदर मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले १७९ सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(उमाशंकर भादुले)**<br>समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | **(तानाजी यादव)**<br>सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | **(डी. एस. कुंभार)**<br>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर |